**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

केंद्र शासनाच्या **भारत मंडपम** प्रकल्पाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करणे, व्यापार मेळावे, अधिवेशन, परिषदा व इतर महत्वाचे कार्यक्रम आयोजित करण्याचे दृष्टीकोनातून राज्यातील बृहन्मुंबई / ठाणे / नवी मुंबई / छत्रपती संभाजीनगर / नागपूर / पुणे / नाशिक महानगरपालिकांच्या मंजूर विकास योजनेमध्ये **"भारत मंडपम"** या नामाभिधानाचे उक्त प्रयोजनाकरिता क्षेत्र आरक्षित ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/नवि-१३,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

चौथा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक : २०.०३.२०२५**

# आदेश

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**प्रस्तावना —**

१) G20 शिखर परिषद भारतामध्ये सन २०२३ या वर्षामध्ये 'भारत मंडपम' मध्ये भरवण्यात आली होती. भारत मंडपमचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २६ जुलै २०२३ रोजी करण्यात आले होते. मा.पंतप्रधान मोदी यांच्या दृष्टीकोनातून भारत मंडपमची उभारणी करण्यात आली आहे. यात भारतीय कलेचे प्रदर्शन करण्यात आले होते. भारत मंडपमची उभारणी २७०० कोटी रुपये खर्च करुन करण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी या केंद्राची निर्मिती करण्यात आली.

२) भारत मंडपमचा प्रमुख उद्देश हा व्यापार मेळावे, अधिवेशन, परिषद आणि इतर महत्त्वाचे कार्यक्रम घेणे असा होता. भारत मंडपमची रचना शंखाच्या आकाराला डोळ्यासमोर ठेवून करण्यात आली होती. मंडपमच्या भिंती आणि समोरील भागावर भारतीय परंपरा आणि संस्कृती दर्शनाची कला दाखवण्यात देशातील वेगवेगळ्या भागातील आदिवासी कलाकूसर आणि चित्र यांचे प्रदर्शन परिषदेमध्ये करण्यात आले होते. सदर परिषदेमध्ये ५५०० वाहने पार्किंग करता येतील इतकी जागा पुरवण्यात आली होती. मंडपमध्ये भिंतीवर २६ स्क्रीन बोर्ड लावण्यात आले आहेत. यात भारताचा पाच हजार वर्षांपासूनच्या इतिहासाची माहिती दाखवण्यात आली. भारत मंडपममध्ये सार्वजनिक कार्यक्रम घेतले जात होते.

३) राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने दि. ११.१०.२०२४ चे पत्रान्वये राज्यातील पर्यटन विकासास चालना मिळावी या उद्देशांने नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्ये किमान १०० एकर एवढे क्षेत्र MICE Centers (Meetings, Incentives, Conferences & Exhibition) करिता राखून ठेवण्यात यावे, अशी विनंती नगर विकास विभागास केली आहे.

४) या व्यतिरिक्त भारत मंडपम, नवी दिल्ली या सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर पुणे येथे सांस्कृतिक चळवळ, संगीत कला केंद्र / मैफील केंद्र यासाठी आरक्षण ठेवण्यात यावे, अशी मागणी काही लोकप्रतिनिधींनी शासनास केली आहे.

५) तसेच राज्य शासनाने १०० दिवसांचा विशेष कृती आराखडा तयार केला असून सदर कृती आराखड्यामध्ये **भारत मंडपम** हा विषय अंतर्भूत आहे. त्यामुळे भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील बृहन्मुंबई / ठाणे / नवी मुंबई / छत्रपती संभाजीनगर / नागपूर / पुणे / नाशिक या महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये तसेच राज्यातील प्रत्येक महसुल विभागामध्ये मुख्यालयातील महानगरपालिका, प्रादेशिक विकास प्राधिकरणे, सिडको, एनआयटी किंवा इतर प्राधिकरणे यांचे क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापार मेळावे, अधिवेशन, परिषद आणि इतर महत्त्वाचे कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीकोनातून उक्त महानगरपालिकांच्या मंजूर विकास योजनेमध्ये भारत मंडपम या नामाभिधानाचे उक्त प्रयोजनाकरिता किमान ३० एकर क्षेत्र राखीव ठेवणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये प्राप्त अधिकारात शासन उक्त नियोजन प्राधिकरणांना खालीलप्रमाणे निदेश देत आहे.

## शासन निदेश

I) केंद्र शासनाच्या भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करणे, व्यापार मेळावे, अधिवेशन, परिषदा व इतर महत्वाचे कार्यक्रम आयोजित करण्याचे दृष्टीकोनातून राज्यातील बृहन्मुंबई / ठाणे / नवी मुंबई / छत्रपती संभाजीनगर / नागपूर / पुणे / नाशिक या महानगरपालिकांच्या मंजूर विकास योजनेमध्ये उक्त प्रयोजनासाठी भारत मंडपम या नामाभिधानाचे किमान ३० एकर क्षेत्र आरक्षित ठेवण्याचे आहे.

II) उक्त निदेशानुसार उक्त महानगरपालिकांनी त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये फेरबदलाची कार्यवाही त्वरित सुरु करावी. तसेच वाहतुक व दळणवळणाच्या दृष्टीकोनातून उक्त प्रयोजनाकरिता आरक्षित जागेची निवड करताना सदरच्या आरक्षणाखालील जागेचे लोकेशन हे शक्यतो विमानतळ, रेल्वे स्थानक, बस स्थानकापासून नजीकच्या परिसरात असावे याची दक्षता संबंधित नियोजन प्राधिकरणांनी घेणे आवश्यक राहील.

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई

III) भारत मंडपम या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करण्यासाठी समुचित प्राधिकरण म्हणून संबंधित महानगरपालिका व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना नियुक्त करण्यात येत आहे. उक्त आरक्षणाचा विकास / वापर करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ते विनियम / विकास नियंत्रण नियमावली ही राज्य शासनाकडून स्वतंत्रपणे सुनिश्चित करण्यात येईल.

IV) तसेच राज्यातील प्रत्येक महसुल विभागामध्ये मुख्यालयातील महानगरपालिका, प्रादेशिक विकास प्राधिकरणे, सिडको, एनआयटी किंवा इतर प्राधिकरणे यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये उक्त प्रयोजनासाठी भारत मंडपम या नामाभिधानाचे किमान ३० एकर क्षेत्रावर आरक्षण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करावी.

V) राज्यातील प्रत्येक महसुल विभागातील महानगरपालिका मुख्यालये, प्रादेशिक विकास प्राधिकरणे, सिडको, एनआयटी इत्यादी प्राधिकरणांनी पुढील एक महिन्यात उक्त प्रयोजनासाठी अशी जागा शासनास सूचवावी. जर एखाद्या महसुल विभागात महानगरपालिका, प्रादेशिक विकास प्राधिकरणे, सिडको, एनआयटी किंवा इतर प्राधिकरणे यांनी उक्त प्रयोजनाकरिता एक पेक्षा जास्त जागा सूचवली तर अशा प्रकरणी शासन याबद्दल अंतिम निर्णय घेईल.

VI) सदरचे निदेश तात्काळ लागू होतील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.*

**(डॉ.प्रतिभा भदाणे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत : - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी : -**

१) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
२) विभागीय आयुक्त, पुणे / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर/कोकण/अमरावती विभाग.
३) सर्व जिल्हाधिकारी.
४) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) सचिव, (पर्यटन) विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी -**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

२) विभागीय सहसंचालक, नगर रचना. नगर रचना कोकण/ छत्रपती संभाजीनगर/ पुणे/नाशिक/ नागपूर विभाग.

३) विभागीय महसूल आयुक्त, पुणे / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर विभाग

४) जिल्हाधिकारी, पुणे / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / मुंबई शहर.

५) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

/- सोबतचे निदेश महाराष्ट्र शासनाच्या **असाधारण** राजपत्रामध्ये राज्यस्तरावर प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभागास व वरील सर्व कार्यालयांना पाठवाव्यात.

६) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर निदेश विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

७) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर निदेश शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

८) निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३).

-------------

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई-32.